ePaper
राष्ट्रवादी काँग्रेस, लोकसभा तिकीटवाटप सुळेंच्या हातात

| वर्ष - 7 | अंक -45 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




## आतील पानांत

- मावळात नवा गडी; नवं राज्य?!
- पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!

www.mahaenews.com | रविवार, दि. 11 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# देहू, आळंदीत वैष्णवांचा मेळा!

## जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान; माउलींच्या पालखीचे आज प्रस्थान

| पिंपरी |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३३८ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावामध्ये संपन्न झाला. तुकोबांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. पालखीचा आजचा मुक्काम हा इनामदार वाड्यात असेल. पुन्हा उद्या ही पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल. देहूतून बाहेर पडताच अनगडशहा बाबा या ठिकाणी पालखीची आरती होईल. ज्ञानोबा- माऊली तुकारामाच्या गजरात वारकरी पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करतील त्यानंतर तुकोबांची पालखी पिंपरी- चिंचवड शहरातील आकुर्डीतील विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल.**



टाळ-मृदुंगाच्या गजरात हजारो भाविक देहूत दाखल झाले असून मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावामध्ये तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. शनिवारपासूनच देहू नगरीत शेकडोच्या संख्येने वारकरी दाखल झाले होते.

आज सकाळी देखील इंद्रायणी नदीमध्ये पवित्र स्नान करून वारकऱ्यांनी तुकोबांचे दर्शन घेतलं. पहाटेपासून विधिवत पूजा, आरती नंतर या सोहळ्याची सुरुवात झाली. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मावळ चे खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, हर्षवर्धन पाटील, सुनेत्रा पवार, आमदार सुनील शेळके, यांच्या उपस्थितीत पूजा संपन्न झाली. वर्षातून एकदा येणाऱ्या या आषाढी वारीसाठी देहू, आळंदीमध्ये हजारो वारकरी दाखल होतात. ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरामध्ये देहभान हरपून टाळ- मृदंगाच्या तालावर स्वतःला झोकून दिल्याचं पाहायला मिळालं. फुगडी, भगवी पताका घेऊन एक- एक दिंडी मंदिरातून पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करत आहे.

### यंदाच्या वर्षी चांगला पाऊस पडावा, बळीराजाचे तुकोबांना साकडे!

» जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी पालखी सोहळ्यात राज्यभरातून वारकरी दाखल झाले आहेत. यंदाच्या वर्षी चांगला पाऊस पडावा अशी मागणी बळीराजाने तुकोबा चरणी केली आहे. यंदाचा पालखी सोहळा हा उत्साहात, निर्विघ्न पार पडावा अशी मागणी देखील बळीराजाने केली आहे. यंदाच्या वर्षी उन्हाची तीव्रता आणि अवकाळी पाऊस यामुळे हाता तोंडाशी आलेली शेतकऱ्यांची पिके गेली. त्यामुळे शेतकऱ्याला मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. तेव्हा मान्सूनमधील पाऊस हा वेळेवर तोही पुरेसा यावा आणि दिलासा मिळावा असे साकडे शेतकरी हे तुकोबाला घालत आहेत. देहू आणि आळंदीचा पालखी सोहळ्याला सुरुवात होत आहे. मात्र उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे लवकरात लवकर तुकोबांनी बळीराजाचे म्हणणे ऐकावे आणि दोन चार दिवसात पाऊस पडावा अशी मागणी बळीराजाकडून करण्यात आली आहे.

### ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा दुपारी प्रस्थान

» पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी वारकऱ्यांची मांदियाळी जमली असून अलंकापुरी सज्ज झाली आहे. रविवारी चारच्या सुमारास प्रस्थान सोहळ्याला सुरवात होणार असून, माऊलींचा पालखी सोहळा गांधी वाडा येथील आजोळघरी आळंदी मुक्कामी असेल. सोमवारी (१२ जून) सकाळी पालखी सोहळ्याची पुण्यनगरीकडे वाटचाल सुरू होईल.

# पंढरीची वारी आणखी सुखकर होणार, हवामान विभागाची मोठी मदत

## » वारीसाठी हवामान विभाग पुणे संपूर्ण कालावधीमध्ये रोज विशेष हवामान सेवा पुरवणार

| पिंपरी | महाईन्यूज

यंदा २९ जून रोजी आषाढी एकादशी आहे. यासाठी आजपासूनच सुरुवात झाली. यंदाच्या या पालखी सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झालं असून यामध्ये आता भारतीय हवामान विभागाच्या, पुणे शाखेने मोठं योगदान दिलं आहे. आषाढी एकादशी जवळ आल्यामुळे संपूर्ण देशभरातून भाविक, भक्त, वारकरी मोठ्या संख्येने पंढरपूरात दाखल होत असतात. २९ जून रोजी आषाढी एकादशी आहे. ऊन, वारा, पाऊस या कशाचंही भान न ठेवता वारकरी हा आपल्या पंढरीची वाट माऊलीच्या अभंगात दंग असतो. पण यंदा एकीकडे ऊन्हाचा तडाखा तर दुसरीकडे पावसाने लोकांना हैराण केलं आहे. अशात हवामान खात्यांना आता मोठा पुढाकार घेतला आहे. आषाढी वारीसाठी हवामान विभाग पुणे संपूर्ण कालावधीमध्ये रोज विशेष हवामान सेवा पुरवणार आहे. यामुळे ही वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे.

यामध्ये मार्गातील सलग हवामानाची निरीक्षणं आणि इत्यादी माहिती असणार आहे. त्यामुळे वारकऱ्यांना हवामानाचा अंदाज मिळेल. इतकंच नाहीतर वारीची व्यवस्था योग्य करण्यासाठी प्रशासनालाही याचा फायदा होणार आहे. यामध्ये पालखी २०२३ आषाढीवारीसाठी IMD पुणे, संपूर्ण कालावधीसाठी रोज विशेष हवामान सेवा पुरवणार आहे. यात मार्गातील सलग हवामानाची निरिक्षणे, पुर्वानुमान व इ. माहीती असणार आहे. दरम्यान, जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३३८ वा पालखी सोहळा आज टाळ मृदुंगाच्या निनादत पार पडला. तुकाराम महाराजांच्या पालखीचा आजचा पहिला मुक्काम हा इनामदार वाड्यात असणारं आहे. त्यानंतर उद्या पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे. पालखी देहुतून बाहेर पडताना संत तुकाराम महाराज यांचे सेवक असलेले अनगडशहा बाबा यांच्या दर्ग्याजवळ पालखीची आरती होणार आहे.

# मावळात नवा गडी; नवं राज्य?

## फडणवीसांचा एक निर्णय, पुन्हा गड ताब्यात घेणार?

### मावळात जोरदार रस्सीखेच, शेळकेंविरोधात फडणवीस कुणाला उतरवणार?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ विधानसभा मतदारसंघ पुणे जिल्ह्यात असूनही भाजपचा बालेकिल्ला राहिलेला हा मतदारसंघ. जनसंघाचे रामभाऊ म्हाळगी पहिल्यांदा आमदार झाले ते या मावळमधूनच. पण २०१९ च्या विधानसभेला भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आलेल्या सुनिल शेळकेंनी वारं फिरवलं आणि भाजपची हक्काची जागा राष्ट्रवादीकडे खेचुन आणली. आमदार होताच सुनिल शेळकेंनी वर्चस्वाचं राजकारण सेट केलं आणि बालेकिल्ला राहिलेल्या मतदारसंघात भाजपची पिछेहाट झाली. त्याचवेळी मतदारसंघाची बांधणी करण्यासाठी रवींद्र भेगडे नावाचा एक तडफदार नेता मैदानात उतरला. हेच रविंद्र भेगडे आगामी विधानसभेसाठी इच्छुक आहेत. त्यातच भाजपने घेतलेल्या एका निर्णयामुळे रविंद्र भेगडेंचं नाव मावळ विधानसभेसाठी पुन्हा चर्चेत आलंय.**



भाजप युवा मोर्चातून भेगडेंनी सक्रीय राजकारणाला सुरूवात केली. २००९ ते २०१४ या कालखंडात भाजप युवा मोर्चा मावळ तालुका अध्यक्ष पद त्यांनी भूषवले. तालुकाअध्यक्ष असतानाही त्यांना २०१४ ला विधानसभेची उमेदवारी नाकारण्यात आली. यानंतरही २०१७ ला जिल्हा परिषदेसाठी इच्छुक असताना पुन्हा संधी नाकारली गेली.

यानंतर भेगडेंनी २०१९ची विधानसभा लढवण्याचा निर्णय घेतला. निवडणुकीच्या दृष्टीने फिल्डिंगदेखील लावली. या वेळेसही पक्षाने त्यांना सबुरीचा सल्ला दिला.

भेगडेंनी विधानसभा लढविण्याचा निर्णय रद्द केला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात २०२० ला पदवीधर मतदारसंघातून विधानसभेत जाण्याचा भेगडे यांनी प्रयत्न केला पण याही वेळी पक्षादेशामुळे ऐनवेळी माघार घ्यावी लागली. पक्षाकडून कायम डावलण्याचे धोरण अवलंबले जात असतानाच भेगडेंनी सामाजिक कार्य चालू ठेवत मतदारसंघात आपली ताकत निर्माण केली आहे.

विधानसभेसाठी इच्छुक असणाऱ्या रविंद्र भेगडेंचीच निवडणुक प्रमुखपदी निवड झाल्याने मावळात भाजपकडून भाकरी फिरवली जाणार असल्याचे संकेत दिल्याची चर्चा आहे. पण सलग दोन टर्म आमदार आणि राज्यमंत्री राहिलेले बाळा भेगडे सहजासहजी माघार घेतील का हे ही पाहणं महत्वाचं असणार आहे. रविंद्र भेगडेंवर मावळमधून उमेदवारी मिळालीच तरी सुनिल शेळकेंसारख्या लोकप्रिय आमदाराला टक्कर देण्याचं आव्हान त्यांच्यासमोर असेल.

### कोण आहेत रविंद्र भेगडे

**» रविंद्र भेगडेंची एका वाक्यात ओळख सांगायची झाली तर मावळचे दिवंगत आमदार दिगंबर भेगडेंचे ते पुतणे आहेत. काकांचा वारसा घेऊन रविंद्र भेगडे मावळच्या राजकारणात नशीब आजमावताना दिसतात. मात्र पक्षाने अनेकदा उमेदवारी नाकारल्याने त्यांना आमदारकीसाठी दहा वर्षापासून वेटिंगवर राहावं लागलंय.**

### बाळा भेगडे माघार घेणार?

**» २०१९ च्या विधानसभेत राज्यमंत्री असुनही बाळा भेगडेंना मावळची जागा राखता आली नाही. त्यानंतर आमदार झालेल्या सुनिल शेळकेंच्या वर्चस्वाच्या राजकारणाने भाजपची मतदारसंघात मोठी पडझड झाली. त्याचवेळी मावळात भाजपचे हात मजबुत करण्यासाठी रविंद्र भेगडे यांनी जीवाचं रान केलं. २०१९ नंतर रविंद्र भेगडेंनी पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर अधिक भर दिला. युवा कार्यकर्त्यांची फौज भाजपसोबत जोडण्याचे प्रयत्न केले. 'मावळ प्रबोधिनी' या सामाजिक संस्थेमार्फत शासकीय योजना खेडोपाडी पोहोचविण्याचे काम केले. तसेच मविआ सरकारच्या विरोधात तालुका अध्यक्ष म्हणून रस्त्यावर उतरून संघर्षही केला. याचेच फळ म्हणून रवींद्र भेगडे यांची मावळ विधानसभा निवडणूक प्रमुखपदी निवड करण्यात आली असल्याचे बोलले जात आहे.**

---

# पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल

## » 65 मुख्य चौकांत बॅरिकेड्स लावले; 47 ठिकाणी वाहतूक वळविली

। पिंपरी । महाईन्यूज

**पालखी सोहळ्यानिमित्त आळंदी, देहूसह पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. तसेच पालखी मार्गांवरील ६५ मुख्य चौकांत बॅरिकेड्स लावण्यात आले असून ४७ ठिकाणी वाहतूक वळविण्यात आली आहे. शनिवार (१० जून) ते सोमवारपर्यंत (१२ जून) वाहतुकीत बदल लागू राहणार आहे.**



संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पिंपरी-चिंचवड शहरातून पंढरपूरकडे मार्गस्थ होतो. पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने वाहतूक नियमनासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांकडून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पालखी मार्गावर अवजड वाहनांना तसेच इतर वाहनांनाही प्रवेश बंदी आहे. पालखी सोबत दिंड्यांची वाहने मोठ्या संख्येने असतात. त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी वाहतुकीत बदल केला आहे.

### जादा मनुष्यबळ उपलब्ध

**» पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने इतर घटकांकडून मनुष्यबळ मागविण्यात आले आहे. त्यात एक पोलिस उपायुक्त, एक सहायक आयुक्त, सहा सहायक निरीक्षक/उपनिरीक्षक, १२० पोलिस कर्मचारी, असे बाहेरील १४८ पोलिस वाहतूक नियमनासाठी उपलब्ध झाले आहेत.**

> पालखीसोबतची वाहने तसेच दिंड्यांच्या वाहनांखेरीज पालखी मार्गावर अवजड तसेच इतर वाहनांना प्रवेश बंदी आहे. वाहतूक नियमांचे पालन न केल्यास दंड आकारून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा.
>
> **- विठ्ठल कुबडे,** सहायक पोलिस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

### वाहतूक नियमनासाठी

पोलिस कर्मचारी - ६००
उपायुक्त - १
सहायक आयुक्त - २
पोलिस निरीक्षक - १०
सहायक निरीक्षक/उपनिरीक्षक - २२
पोलिस कर्मचारी - ४००
वार्डन - १५६

### वाहतुकीत बदल असा...

| वाहतूक विभाग | - महत्त्वाचे चौक | - वळण |
|---|---|---|
| तळवडे | - ७ | - ५ |
| देहूरोड | - ७ | - २ |
| निगडी | - ७ | - ७ |
| चिंचवड | - ४ | - ८ |
| पिंपरी | - ७ | - ८ |
| भोसरी | - ११ | - ८ |

## 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला

# संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!

### » आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा
### दिघी, भोसरी परिसरातील सांडपाणी प्रश्न निकाली लागणार!

। पिंपरी।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग (CME) च्या हद्दीतील ४५ एमएलडी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP), पंपिंग स्टेशन आणि संबंधित कामांना संरक्षण विभागाने 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून साडेसहा एकर जागेत हा प्रकल्प सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. .**






दिघी आणि भोसरी परिसरातील वाढते शहरीकरण व त्या तुलनेत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उपलब्ध नव्हते. तसेच महापालिका पालिका हद्दीत आरक्षण विकसित करण्यासाठी पर्याय नव्हता. त्यामुळे सीएमई हद्दीत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारावा, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी २०२१ मध्ये केली होती. त्यानंतर नोव्हेंबर २०२२ मध्ये महापालिका प्रशासनाने तसा प्रस्ताव संरक्षण विभागाकडे पाठवला होता. त्याअनुसरून, संरक्षण विभागाचे सचिव आर. एस. यादव यांनी सीएमई हद्दीतील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि संबंधित कामे करण्यास पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले आहे.

महापालिका प्रशासनाने सप्टेंबर २०२१ मध्ये सीएमई परिसरात पाहणी दौरा केला होता. मोकाट जनावरे, अतिक्रमण, रस्ते, नाल्यांची सफाई, सांडपाणी व्यवस्था अशा अनेक समस्यांबाबत संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा झाली होती. भोसरी आणि दिघी परिसरातून नाल्यांद्वारे सीएमई हद्दीत येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सुमारे १० एकर जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यावेळी महापालिका प्रशासनाने केली होती. या जागेत एसटीपीसह पंप हाउस, सम्प वेल्स उभारण्याबाबतही चर्चा झाली होती. त्यानुसार संरक्षण विभागाने विनामोबदला साडेसहा एकर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या जागेत एसटीपी आणि संबंधित प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. प्रकल्पासाठी सीएमई-पीसीएमसी ची संयुक्त समिती... जागा उपलब्धतेनंतर आता महापालिका आणि सीएमईच्या माध्यमातून एसटीपी आणि संबंधित प्रकल्पाच्या देखरेखीकरता संयुक्त समिती स्थापन करण्यात येईल. सल्लागार कंपनीची नियुक्ती करून खर्च आणि कालावधी निर्धारित करण्यात येईल. त्यानंतर निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल. सांडपाणी एसटीपीपर्यंत वाहून नेण्यासाठी लागणारी लाईन टाकण्याची जबाबदारी महापालिकेची राहणार आहे. प्रक्रिया केलेले पाणी नंतर नाल्यात सोडले जाईल किंवा महापालिका त्याचा विनियोग करेल. साडेसहा एकरमध्ये एसटीपी, २ हजार चौरस फुटाच्या ४ प्लॉटमध्ये पंपिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत.

> **भोसरी आणि दिघी परिसरातून निर्माण होणारे सांडपाणी नाल्यांद्वारे सीएमई हद्दीतून पुढे जात होते. त्यामुळे सीएमई हद्दीतच सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारावा अशी मागणी मी २०२१ मध्ये तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्याकडे केली होती. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात या प्रस्तावाला खोडा घालण्यात आला. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, जलनि:सारण विभागाचे तत्कालीन सह शहर अभियंता रामदास तांबे यांच्या सहकार्याने सीएमईमध्ये एसटीपी उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. आगामी दोन महिन्यांत निविदा प्रक्रिया राबवून प्रकल्पाचे काम लवकर सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे.**
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी देहू, आळंदी येथील सुरक्षेचा घेतला आढावा

### »पालखी सोहळा सुरक्षित पार पडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांचे सूक्ष्म नियोजन

। पिंपरी । महाईन्यूज

**संतश्रेष्ठ जगद्गुरू संत तुकाराम महाराज या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी देहू आणि आळंदी येथे भेट देऊन बंदोबस्त व्यवस्थेचा आढावा घेतला.**



आळंदी आणि देहू ही दोन्ही तीर्थक्षेत्रे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आहेत. पालखी सोहळा सुरक्षित पार पडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सूक्ष्म नियोजन केले आहे. पालखी सोहळ्यासाठी चार हजार 528 अधिकारी आणि अंमलदार तसेच एसआरपीएफच्या तीन तुकड्या, एनडीआरएफच्या चार तुकड्या असा भलामोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी विविध उपाययोजना देखील केल्या आहेत.

संत तुकाराम महाराज पालखी 10 जून रोजी देहूगाव येथून प्रस्थान ठेवणार आहे. पालखीचा पहिला मुक्काम देहूगाव येथील इनामदार वाड्यात होणार आहे. त्यानंतर 11 जून रोजी तुकोबांची पालखी देहूगाव येथून आकुर्डीकडे प्रस्थान करेल. पालखीचा 11 जून रोजीचा मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरात असेल. याच दिवशी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदी येथून प्रस्थान ठेवेल. तिचा 11 जून रोजीचा मुक्काम गांधीवाडा आळंदी येथे असेल. त्यानंतर 12 जून रोजी दोन्ही पालख्या पुणे शहराकडे प्रस्थान करणार आहेत.

पालखी सोहळ्यावर तीन अत्याधुनिक सर्व्हेलन्स व्हेईकल करडी नजर ठेवणार आहेत. पालखी मार्गावर 345 सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून चार ड्रोन कॅमेरे निगराणी करणार आहेत. बॉम्ब शोधक नाशक पथकाच्या चार टीम असणार आहेत. महिला वारकरी आणि पालखीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या महिलांच्या छेडछाडीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी दोन पथके तयार केली आहेत. तसेच सोनसाखळी चोरीच्या घटना रोखण्यासाठी 12 पथके तयार केली आहेत.

नागरिकांसाठी 39 ठिकाणी सूचना फलक लावले आहेत. महत्वाच्या चार ठिकाणी पोलीस मदत केंद्र तर चार ठिकाणी महिलांच्या संरक्षणासाठी दामिनी पथके असतील.

### आळंदी येथे सात तर देहू येथे 30 डायव्हर्जन

»वारकऱ्यांच्या वाहनांसाठी पासेसची व्यवस्था पोलिसांकडून करण्यात आली आहे. आठ व्हिडीओग्राफी कॅमेरे, चार सीसीटीव्ही, ड्रोन निगरणी पथके असतील. एक हेल्प डेस्क असेल. नागरिकांना कोणतीही अडचण आल्यास या हेल्प डेस्कची मदत घेता येईल. दोन्ही पालखी मार्गावर 20 ठिकाणी वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. पालखी मार्गावरील इतर वाहतूक पूर्णपणे वळवली आहे. आळंदी येथे सात तर देहू येथे 30 डायव्हर्जन देण्यात आले आहेत.

# जगावं की मरावं एवढाच प्रश्न आहे का ?



दृष्टांत

-कांचन कदम-सुतार
+91 97676 45342

**TO BE OR NOT TO BE THAT IS THE QUESTION जगावं की मरावं एवढाच प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ नाटकापुरताचं' मर्यादित आहे असे नसून. हा प्रश्न येणाऱ्या काळात पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाला पडेल. याचे कारण लक्षात येत नाही का? तर थांबा आणि आजूबाजूला नजर फिरवा. निसर्गाचे निरीक्षण करा. निसर्गातील प्रत्येक घटक तुमच्याकडे याचना करताना दिसेल. जणू ते सर्वजण सांगत आहेत.**

'हा नाश थांबवा भूमातेचे तनमन जळत आहे. ही वसुंधरा जनसंख्येच्या भाराने रडते आहे, आहे आपली धरणीमाय, आपली भूमाता हे सत्य घेऊन ढसाढसा रडत आहे. आणि आपण तिचे अश्रू पुसायचे सोडून तिला अधिक चटके देत आहोत. सहनशीलता असावी तर 'पृथ्वीसारखी' असे म्हटले जाते. आपण तिच्यावर जनसंख्येचे अफाट ओझे लादतच चाललो आहोत. विज्ञानयुगातही जगाची लोकसंख्या ७ अब्जपेक्षा जास्त असावी, हे आपले दुर्दैवच मानावे लागेल. लोकसंख्येचा भस्मासूर आपणासर्वांना गिळण्यासाठी 'आ' वासून बसला आहे, तरी आपण मानव असतांना आधुनिकतेच्या मागे धावत आहे. याचा परिणाम नैसर्गिक साधनसंपत्ती, अपव्यय, संसाधनांचा तुटवडा, रोगराई, उपासमार, प्रदूषणावर होताना दिसून येत आहे.




पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनली असून सजीवसृष्टीच्या अस्तित्त्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासाला फक्त आणि फक्त मनुष्यच कारणीभूत आहे, असे मला वाटते 'माणसा तुझ्या स्थितीचा तूच अपराधी आहेस.

भारतभूमीचे सौंदर्य दाखवण्यासाठी भारतातील खेडी पुरेशी आहेत, पण या सौंदर्याला नजर लागली ब्रिटिशांची, केवळ त्यांचीच नाही तर खुद्द भारतीयांची सुद्धा. महात्मा गांधींनी हे ओळखले होते आणि त्यांनी लोकांना 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला. खेडी वाचली तर पर्यावरण वाचेल ही दूरदृष्टी महात्मा गांधीजींकडे होती, असे मला वाटते खेड्यामध्ये एक संपन्न जीवन होतं, मातीची घरे, शेणामातीने सारवलेली अंगणे, घराभोवती परसामध्ये लावलेली पर्यावरण पुरवक झाडे, औषधीवनस्पती, घरांची रचना, गावातील पाणवठ्याची सोय, कठडे बांधलेल्या विहिरी, केरकचरा विल्हेवाट, शेणापासून शेणखत, गोबरगॅस, ऋतुमानानुसार, घेतली जाणारी पिके, शेणखतावर आधारित शेती, सांडपाण्याची व्यवस्था, गुरांना चराईची राखीव जागा. यांसारख्या बऱ्याच आदर्श आणि पर्यावरणपूरक गोष्टी खेड्यामध्ये होत्या.

परंतु पाश्चिमात्य संस्कृतीच्या हव्यासामुळे आम्ही या सौंदर्याला गालबोट लावले. एकेकाळी समृद्ध असणारी खेडी आज भकास माळराने दिसू लागली आहेत. याला जबाबदार आपणच. ही झालेली चूक अजूनही सुधारता येइल. त्यासाठी प्रत्येकाने प्रत्येकवेळी सजगता ठेवायला हवी. आपल्या आजूबाजूच्या निसर्गाला त्रास होईल, असे वर्तन आपण टाळायला हवे. प्रत्येक गोष्टीची सुरुवात स्वतःपासूनच करायला हवी. जितकी सुबत्ता येते तितक्या गरजा वाढतात. आपल्या गरजा कमी केल्यास नैसर्गिक घटकांचा अतिवापर होणार नाही. उदा. आज प्रत्येकाकडे गाडी आहे, त्यासाठी लागणारे इंधन "अपुरे पडू लागले आहे. त्यामुळे गाडीचा वापर गरजेपुरता केल्यास आपण इंधन बचत करू शकतो.

## संपादकीय »

### तात्पुरती माघार?

***राज्यातील सर्व सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी एकसमान गणवेश पुरविण्याचा निर्णय मागे घेण्याचा राज्य सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र, पुढील वर्षी स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिलाई करून एकसमान रंगाचे गणवेश विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणार असल्याचे सूतोवाच करण्यात आले आहे..***

त्यामुळे माघारीचा निर्णय यंदापुरताच असल्याचे दिसते. वास्तविक 'एक राज्य, एक गणवेश'सारखा निर्णय घेण्याची राज्य सरकारची कृती शाळा व्यवस्थापन समितीच्या कामकाजातील हस्तक्षेप करणारी आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) गणवेश ठरविण्याचा अधिकार शाळा समितीला आहे. त्यामुळे सरकार थेट 'आरटीई'ला वळसा घालण्याचा प्रयत्न होता. मे महिन्याच्या अखेरीस शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी असा निर्णय जाहीर केल्यानंतर त्याच्या बेकायदा स्वरूपापासून अंमलबजावणीपर्यंतचे अनेक मुद्दे उपस्थित करून विरोध होत होता. विशेषत: मुख्याध्यापकांच्या आणि शिक्षकांच्या संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली होती.

**आपल्या देशात प्रत्येक घटनेसाठी मजबूत कायदे आणि नियम आहेत मात्र प्रशासकीय यंत्रणा भ्रष्टाचाने एवढी पोखरली आहे की कायद्याचा अपवाद वगळता कुठेही वापर होताना दिसत नाही हे बघूनच प्रत्येक क्षेत्रातील अपराधी शिरजोर बनले आहेत. खून, दरोडे, हत्या, हाणामारी आणि स्त्रियांवरील भयंकर अत्याचार यांनी आपल्या देशात आकाशाला गवसणी घातली आहे.**

## माणसाच्या रूपातील क्रूरकर्मा

राष्ट्रीय गुन्हे नोंदणीनुसार देशात दररोज कुठेतरी दहा मुलींवर अत्याचार होतात. अत्याचारित मुलगी बहुसंख्य समाज आणि किमान मध्यमवर्गीय असेल तर तिच्यावरील अत्याचाराची कुठेतरी चर्चा होते इतर हजारो मुलींवरील अत्याचारांना वाचाही फुटत नाही हे आपल्या देशातले भयंकर वास्तव आहे. सतत गुन्हेगारीच्या बातम्या दाखवणाऱ्या माध्यमाचा सुखवस्तू लोकांना कंटाळा येतोय मात्र देशात हे सोडून अन्य काही घडत आहे की नाही असे वातावरण तयार झाले आहे. राक्षसी कृत्य करण्याची अपराधी वर्गात जणू स्पर्धाच लागली आहे.

दिल्ली,मुंबई,नागपूर,लखनौ ,चंदीगड,अश्या महानगरात प्रत्येक महिन्यात किडे,मुंग्या माराव्यात तश्या अत्याचार करून मुली मारल्या जात आहेत. दिल्लीतील साक्षीचे रुदन ऐकल्यावर मुंबईत अकोल्याच्या मुलीवर शासकीय वसतिगृहात अत्याचार करून तिचा खून करण्यात आला. या बातमीने समाजमन सुन्न असतानाच मुंबईत लिव्ह इन मध्ये राहणाऱ्या एका मैत्रिणीच्या देहाचे अनंत तुकडे करणारा नराधम मनोज साने याचा भेसूर चेहरा जगासमोर उघड पडला आहे. मीरा रॉड भागात गीता नगर येथील आकाशदीप इमारतीच्या सातव्या मजल्यावर मनोज साने [५६] आणि सरस्वती वैद्य [३४] हे दोघे लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत होते ,जिच्यासोबत आपण तीन वर्ष राहतो त्याच सरस्वतीची या नराधमाने हत्या



केली. एवढ्यावरच तो थांबला नाही तर तिच्या देहाचे अनेक तुकडे करून ते नष्ट करण्यासाठी त्येनं कुकर मध्ये शिजवले हे लिहिताना सुद्धा थरकाप उडावा एवढे भीषण कृत्य घडले आहे.

शिक्षण, संस्कार आणि माणूसपण याला जात,धर्माच्या कोणत्याही मर्यादा आता उरल्या नाहीत. बदमाशी,क्रूरता,पशुत्व आणि नराधमता हे अवगुणही आता कुण्या एका जातीधर्माची मिरासदारी राहिली नाही. समाजात सहजच कुणाकडे बघून आपण काही शिक्के मारीत असतो. ज्यांना लोक समजुतीने गुन्हेगार ठरवले त्या रामोशी समाजात अनेक सामाजिक कार्यकर्ते तयार होत आहेत आणि दुसऱ्या बाजूला समाजाने ज्यांना देव समजले ते साने सुद्धा क्रूरकर्मात मेरिट मिळवत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नियुक्ती ताईंची, चर्चा दादांची!

## राष्ट्रवादीच्या कार्यकारी अध्यक्षपदासह राज्याचे प्रभारीपद सुप्रिया सुळेंकडे

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अध्यक्षपदाच्या राजीनामानाट्यातून सावरत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये 'भाकरी फिरवण्याच्या' मालिकेतील निर्णायक अंक शनिवारी रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात पाहायला मिळाला. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी सुप्रिया सुळे यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करून त्यांच्याकडे महाराष्ट्राच्या पक्ष संघटनेची जबाबदारी सोपवली. त्यातून पवार यांनी आपल्या राजकीय उत्तराधिकाऱ्याबाबत स्पष्ट सूतोवाच केल्याने आता अजित पवार यांची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या २५व्या वर्धापनदिनानिमित्त नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल आणि सुप्रिया सुळे यांची कार्यकारी अध्यक्षपदी निवड करण्यात येत असल्याची घोषणा केली. या वेळी अजित पवार हेही उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर अजित पवार तडक निघून गेल्याने ते नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. "नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन. पक्षाने टाकलेला विश्वास हे पदाधिकारी सार्थ ठरवतील", असे ट्वीट अजित पवार यांनी नंतर केले.

शरद पवार यांनी गेल्या महिन्यात पक्षाध्यक्षपदावरून पायउतार होण्याची घोषणा केली तेव्हाच सुप्रिया सुळे यांना अध्यक्षपद देण्यात येणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. छगन भुजबळ आणि अन्य नेत्यांनी तशी जाहीरपणे मागणी केली होती. पवारांनी राजीनामा मागे घेतल्याच्या पार्श्वभूमीवर आता सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांची कार्यकारी अध्यक्षपदी निवड करून पवारांनी सुप्रिया सुळे याच आपल्या राजकीय उत्तराधिकारी असतील, असे स्पष्ट संकेत दिले. अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा मध्यंतरी सुरू झाली होती. अजितदादा आपल्या काही समर्थक आमदारांसह भाजपबरोबर जाणार असल्याच्या वावड्या उठत होत्या. त्यानंतर शरद पवार यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची केलेली घोषणा आणि राजीनामा मागे घेऊन अजित पवार यांना खिंडीत गाठल्याचे मानले जाते. पक्षावर आपलीच हुकूमत चालेल, असा स्पष्ट संदेश पवारांनी पुतण्याला दिला होता. अजित पवार की, सुप्रिया सुळे यापैकी पवारांचा राजकीय उत्तराधिकारी कोण, अशी चर्चा नेहमीच रंगते. सुप्रिया सुळे यांना कार्यकारी अध्यक्ष नेमून आणि त्यांच्याकडे महाराष्ट्राची जबाबदारी सोपवून पवारांनी स्पष्ट संदेश दिला आहे. राष्ट्रवादीच्या राज्याच्या राजकारणात मुक्तवाव मिळावा, अशी अजित पवार यांची इच्छा लपून राहिलेली नाही. 'नेत्यांचा फक्त आशीर्वाद घ्यायचा, निर्णय आपणच घ्यायचे', असे विधान काही वर्षांपूर्वी अजित पवार यांनी केले होते. त्यावर पक्षाचे निर्णय आपल्या संमतीनेच होतील, असे प्रत्युत्तर शरद पवार यांनी काही काळानंतर दिले होते. सुप्रिया सुळे यांची राज्याच्या प्रभारीपदी निवड करण्यात आल्याने पक्षांतर्गत कारभारात आता शरद पवार आणि सुप्रिया सुळे या दोघांचा निर्णय अंतिम असेल. हे अजित पवार यांना कितपत मान्य होईल, याकडे राजकीय जाणकारांचे लक्ष वेधले आहे. काहीही झाले तरीही राष्ट्रवादी सोडणार नाही, असे अजित पवार यांनी मध्यंतरी जाहीर केले असले तरी पक्षात कोंडी होणार असल्यास ते कितपत जुळवून घेतील याबाबत साशंकता आहे. सुप्रिया सुळे यांची कार्यकारी अध्यक्ष आणि राज्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करून शरद पवार यांनी अजित पवार यांचे पंख छाटल्याची प्रतिक्रिया पक्षाच्या नेत्यांकडूनच व्यक्त करण्यात येते. या घडामोडी लक्षात घेता अजित पवार शांत बसणार नाहीत, असे मानले जाते. अजित पवार यांचे २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीच्या वेळचे बंड फसले होते. यामुळेच त्यांच्या पुढील राजकीय हालचालींकडे राजकीय निरीक्षकांचे बारीक लक्ष आहे.

### अजितदादांच्या जखमेवर मीठ चोळले...

**राज्य राष्ट्रवादीत सध्या अजित पवार विरुद्ध जयंत पाटील यांच्यात संघर्ष सुरू झाला आहे. विरोधी पक्षनेतेपद अजितदादांकडे गेल्यापासून जयंत पाटील अस्वस्थ आहेत. अजित पवारांनी जयंत पाटील यांची कुरापत काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा शरद पवारांचा कल जयंत पाटील यांच्याकडे होता. सुप्रिया सुळे यांची महाराष्ट्राच्या प्रभारीपद निवड झाल्यावर आगामी काळात त्यांच्या सल्ल्यानेच राज्याचा कारभार केला जाईल, असे जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगून एक प्रकारे अजित पवार यांच्या जखमेवर मीठच चोळल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जाते. राज्याचा कारभारा यापुढे अजित पवार नव्हे, तर सुप्रिया सुळे यांच्या सल्ल्याने होईल हे जयंत पाटील यांनी अधोरेखित केले.**

> खासदार प्रफुलभाई पटेल, खासदार सुप्रियाताई सुळे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन. पक्षाने टाकलेला विश्वास हे पदाधिकारी सार्थ ठरवतील, असा विश्वास आहे.
>
> **-अजित पवार,** विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र, विधानसभा

> राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षपदी सुप्रिया सुळे आणि प्रफुल पटेल यांची नियुक्ती सर्वसंमतीने करण्यात आली आहे. या प्रक्रियेत अजित पवार यांनाही विश्वासात घेण्यात आले होते. शिवाय, त्यांच्याकडे आधीच महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद असल्याने त्यांना नवी जबाबदारी देण्यात आलेली नाही.
>
> **-शरद पवार,** अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस.

---

# बिपरजॉय चक्रीवादळ २४ तासांत तीव्र!

## मुंबईत जोरदार वारे, समुद्रही खवळलेला

। ठाणे । महाईन्यूज

**बिपरजॉय चक्रीवादळ येत्या २४ तासांत तीव्र रूप धारण करणार असून त्याचा प्रभाव कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणावर जाणवू शकतो, मात्र मुंबईला त्याचा फारसा धोका नाही, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला. दरम्यान, शनिवारी जोरदार वाऱ्यांमुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरात धूळ आणि वाळूचे लोट उसळले होते. तसेच समुद्रही खवळला होता.**



बिपरजॉय चक्रीवादळ गोव्याच्या पश्चिमेस सुमारे ७०० किमीवर आणि मुंबईच्या नैऋत्येला ६३० किमीवर आहे. आगामी २४ तासांत ते आणखी तीव्र होऊन ईशान्येकडे सरकण्याची शक्यता आहे. त्याचा प्रभाव कोकण किनारपट्टी आणि गुजरातमध्येही जाणवेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

### इशारा काय?

**येत्या दोन दिवसांत बिपरजॉय चक्रीवादळाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवण्याची आहे. वाऱ्यांचा ताशी वेळ ४० ते ५० किलोमीटर असेल. तो ताशी ६५ किलोमीटरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.**

### वाऱ्याच्या तडाख्याने...

बिपरजॉय चक्रीवाऱ्यांमुळे अनेक ठिकाणी धुळीचे लोट उसळले. तसेच मुंबई शहर आणि उपनगरात १६ वृक्ष उन्मळून पडले.

### मोसमी पाऊस 48 तासात महाराष्ट्रात

चक्रीवादळ उत्तरेकडे सरकताच मोसमी वाऱ्यांनी कर्नाटकची किनारपट्टी गाठली. सोमवारपर्यंत गोवा आणि महाराष्ट्रात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

चक्रीवादळाची तीव्रता वाढू शकते. मात्र त्याचा मुंबईला धोका नाही. मुंबई आणि आसपासच्या परिसरात दोन दिवस जोरदार वारे वाहतील. काही ठिकाणी हलका पाऊसही पडू शकतो. असे हवामान विभागाच्या सुषमा नायर यांनी सांगितले.

---

# काँग्रेसच्या चार पिढ्यांनी केले नाही ते काम मोदींनी केले!, अमित शहा यांची काँग्रेसवर टीका

। नांदेड । महाईन्यूज

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसच्या चार पिढ्यांनी देशात जे काम केले नाही, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत करून दाखविले आहे. मोदींनी परदेशातही भारताचा सन्मान वाढविल्याचा दावा करताना, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुढील वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत मोदींच्याच हाती सत्ता सोपविण्याचे आवाहन येथील जाहीर सभेमध्ये शनिवारी केले.

आपल्या भाषणात त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचाही वेगवेगळ्या मुद्द्यांवर समाचार घेतला. पंतप्रधान मोदी यांच्या कारकिर्दीस नऊ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भाजपने देशपातळीवर सुरू केलेल्या महाजनसंपर्क अभियानात अमित शहा यांची महाराष्ट्रातील पहिली सभा नांदेड नगरीतील गुरूद्वारालगतच्या अबचलनगर पटांगणात झाली. भाषणाच्या प्रारंभी त्यांनी तत्कालीन हैदराबाद संस्थान आणि मराठवाड्याच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचा उल्लेख करून तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वातंत्र्यलढ्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांना अभिवादन केले.

# आलिशान गाड्या सोडून ट्विंकलने केला रिक्षातून प्रवास



बॉलिवूड स्टार्स नेहमीच त्यांच्या आलिशान वाहनातून प्रवास करतात. पण असे अनेक कलाकार आहेत जे आपली महागडी वाहने सोडून मुंबईच्या रस्त्यावर ऑटोरिक्षाचा आनंद लुटताना दिसतात. अक्षय कुमारची पत्नी ट्विंकल खन्नाही तिच्या मुलीसोबत ऑटो रिक्षामध्ये फिरताना दिसली आहे.

ट्विंकल खन्नाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, ट्विंकल तिची छोटी राजकुमारी नितारासोबत ऑटो रिक्षामध्ये प्रवास करत आहे. तिच्या मुलीच्याही हातात काही शॉपिंग बॅग आहेत.

ट्विंकल खन्ना आणि तिची लाडकी मुलगी ऑटोरिक्षात बसताना पाहून पापाराझींनी त्यांना आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आहे. शेवटी, हा क्षण सर्वांसाठी खास होता, कारण बॉलिवूडचा ॲक्शन किंग अक्षय कुमारची पत्नी आणि मुलगी त्यांच्या महागड्या आलिशान गाड्या सोडून सार्वजनिक वाहतुकीचा आनंद लुटताना याआधी क्वचितच पाहिलं असेल.

# "ड्रग्ज घेणाऱ्या अभिनेत्याने श्रीरामांची भूमिका..." कंगना

बॉलिवूड बिनधास्त आणि बेधडक अभिनेत्रींपैकी एक म्हणजे कंगना रणौत. ती सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. समाजातील किंवा बॉलीवूडमधील तिला न पटणाऱ्या गोष्टींबद्दल ती अगदी स्पष्टपणे भाष्य करत असते.



आतापर्यंत अनेकदा तिने तिच्या पोस्टमधून बॉलीवूड स्टार्सना लक्ष केलं आहे. तर आता पुन्हा एकदा तिने एक मोठी पोस्ट शेअर करत आघाडीच्या अभिनेत्यावर टीका केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून बॉलीवूडमध्ये अनेक ऐतिहासिक आणि पौराणिक चित्रपट प्रदर्शित होत आहेत. सध्या 'आदिपुरुष' चित्रपटाची सर्वत्र चर्चा असताना नितेश तिवारी यांनी काही दिवसांपूर्वी रामायणावर आधारित चित्रपटाची घोषणा केली. या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूर श्रीरामांच्या भूमिकेत दिसणार आहे, तर अभिनेत्री आलिया भट्ट या चित्रपटामध्ये सीतेची भूमिका साकारणार आहे. पण आता या कास्टिंगवर कंगनाने जोरदार टीका केली आहे. कंगनाने एक इंस्टाग्राम स्टोरी शेअर करत लिहिलं, "अलीकडेच रामायण चित्रपट येत असल्याची बातमीने ऐकली. या चित्रपटात एक हडकुळा पांढरा उंदीर (तथाकथित अभिनेता) ज्याला थोड्या समजुतीची गरज आहे. जो पीआरच्या मदतीने बॉलीवूडमधील जवळजवळ प्रत्येक व्यक्तीबद्दल वाईट गोष्टी पसरवतो.

# शाहरुखच्या चाहत्यांची कमाल!

मुंबई- शाहरुख खानची फॅन फॉलोइंग हा एक चर्चेचाच विषय आहे. यंदा वर्षाची सुरुवात शाहरुख खानच्या सुपरहिट पठाण चित्रपटाने झाली. या चित्रपटातून अभिनेत्याने तब्बल ४ वर्षांनी मोठ्या पडद्यावर पुनरागमन केले होते. त्यामुळे इतक्या वर्षांनी आपल्या लाडक्या अभिनेत्याला पाहणं चाहत्यांसाठी नेत्रसुख होते. तसं तर अभिनेत्याची एक झलक पाहण्यासाठी मुंबईतील बांद्रा येथील त्याच्या 'मन्नत' निवासस्थानाबाहेर हजारो चाहते दररोज गर्दी करतात. प्रत्येकला त्याची ती एक झलक पाहण्यास मिळतेच असे नाही. परंतु अभिनेता प्रत्येक वेळी आपल्या चाहत्यांना भेटण्यासाठी त्याच्या घराच्या बाल्कनीतून सर्वांना अभिवादन करत असतो.

काल असेच काहीसे घडले. शाहरुख खानने आपल्या उपस्थितीने चाहत्यांना आनंदित केले आणि त्यांना अभिवादन करण्यासाठी तो बाहेर आला. शाहरुखने चाहत्यांसाठी तीच आयकॉनिक पोझ दिली, जी तो वर्षानुवर्षे करत आला आहे. पण यावेळी असे काही घडले की ज्यामुळे चक्क विश्वविक्रम झाला. शाहरुखच्या चाहत्यांनी मिळून एक विश्वविक्रम केला आहे.



# सिनेसृष्टीतील सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता-स्वप्नील जोशी !

छोटा पडदा असो किंवा मोठा पडदा आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारा, आओ ना फिर म्हणत सगळ्यांना आपल्या प्रेमात पाडणारा लोकप्रिय अभिनेता स्वप्नील जोशी आज यशाच्या शिखरावर आहे. स्वप्नीलने त्याच्या अभिनयातील करिअरमध्ये अनेक चित्रपटात काम केलं. त्याने त्याची प्रत्येक भूमिका जिवंत केली. लहानपणी तो श्रीकृष्ण बनत अनेकांसाठी देव झाला. तर मोठेपणी आपल्या रोमँटिक भूमिकांमधून त्याने तरुणाईला प्रेमाची भाषा शिकवली. सध्या स्वप्नील जोशी हा मराठी चित्रपटसृष्टीमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. तो अनेक मालिकांमधूनही प्रेक्षकांच्या भेटीला येत असतो. मात्र सगळ्यांचा लाडका



स्वप्नील एका चित्रपटासाठी किती मानधन घेतो ठाऊक आहे का?

स्वप्नील मराठी चित्रपटसृष्टीचा सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता आहे. चित्रपट हिट झाल्यानंतर त्यानेही आपल्या मानधनात वाढ केली होती. अर्थात मराठी कलाकारांना हिंदी कलाकारांइतकं मानधन मिळत नसलं तरी त्यांचं मानधनही त्यांच्या चाहत्यांमधील लोकप्रियतेवर अवलंबून आहे. त्यात स्वप्नीलची लोकप्रियता तर प्रचंड आहे. स्वप्नीलने 'वाळवी', 'दुनियादारी', 'मुंबई- पुणे- मुंबई', 'मितवा', 'तू ही रे', 'भिकारी' सारखे कित्येक हिट चित्रपट केले आहेत. एका वेबसाइटने दिलेल्या माहितीनुसार स्वप्नील सध्या एका चित्रपटासाठी ५० लाख ते ६० लाख एवढं मानधन घेतो. हा आकडा कमी जास्तही असू शकतो. दुसरीकडे स्वप्नील नुकताच मालिकेत झळकला होता.

# परेश रावल यांनी मराठी नाटकात काम करणं नाकारलं

मुंबई- लोकप्रिय बॉलिवूड अभिनेते परेश रावल यांनी कधी बाबुराव बनून प्रेक्षकांना हसवलं तर कधी नकारात्मक भूमिका करून प्रेक्षकांच्या शिव्याही ऐकल्या. मात्र त्यांनी साकारलेली प्रत्येक भूमिका त्यांनी जिवंत केली. 'ओह माय गॉड' मधील देवाशी भांडणारे परेश रावल असतील किंवा 'भूलभुलैया' मधील सगळ्यांना पोट धरून हसवणारे परेश रावल असतील त्यांनी आपल्या भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं. मात्र इतकी वर्ष महाराष्ट्रात राहूनही त्यांनी कधी मराठी चित्रपटांमध्ये छोटीशी भूमिका का केली नाही? किंवा एखादं मराठी नाटक का केलं नाही असं विचारल्यावर त्यांनी दिलेलं उत्तर खरंच ऐकण्यासारखं होतं. परेश यांनी नुकतीच सोनी मराठीच्या 'कोण होईल करोडपती' या कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी यामागचं कारण सांगितलं.

कार्यक्रमात बोलताना परेश रावल म्हणाले, 'अरे



बापरे... नवीन भाई ठक्करच्या इथेच नाटक असायचे सगळ्यात जास्त. रसिक नाट्य संस्था. मोठे मोठे प्रयोग व्हायचे तिथे. अमोल पालेकर यांचाही झाला होता आणि मी भाग्यवान आहे की मी मराठीची नाटक पाहिलं. खूप पाहिलं. मी हे म्हणू शकतो की जे काही चांगलं आहे ते मी इथून शिकलो अभिनयाच्या बाबतीत. कारण एक सहजपणा असतो. मराठी कलाकार फार शांत आणि सहज अभिनय करतात. खोटेपणा नसतो.

# साक्षी मलिकचा सरकारला अल्टिमेटम!

## कुस्तीपटूंच्या मागण्या पूर्ण न झाल्यास यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धांवर बहिष्कार

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

डब्ल्यूएफआयचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंग यांच्याविरोधात निदर्शने करत भारतातील अव्वल कुस्तीपटूंनी त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धांवर बहिष्कार घालण्याची भूमिका घेतली आहे. २०१६ ची ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीपटू साक्षी मलिक म्हणाली की, जेव्हा या सर्व समस्यांचे निराकरण होईल तेव्हाच आम्ही आशियाई खेळांमध्ये सहभागी होऊ. आम्ही दररोज मानसिकरित्या कशातून जात आहोत हे तुम्ही समजू शकत नाहीत. हे प्रकरण भारतीय कुस्ती महासंघाचे (WFI) प्रमुख आणि भाजप खासदार बृजभूषण शरण सिंग यांच्यावर लैंगिक छळाच्या अनेक गंभीर आरोपांनुसार गुन्हा



दाखल करण्यात आल्याच्या संबंधित आहे.

मलिक आणि बजरंग पुनिया यांच्यासह आंदोलक कुस्तीपटूंनी आज हरियाणातील सोनपत येथे खाप नेत्यांसोबत महापंचायत घेतली. पुनिया म्हणाले की, पहलवान महापंचायतीतील खाप नेत्यांसह त्यांच्या चर्चेचा तपशील सरकारशी शेअर करण्यात येईल. कुस्तीपटूंमधील मतभेदाच्या बातम्यांवर मलिक म्हणाली की, मला एक गोष्ट स्पष्ट करायची आहे की, मी, बजरंग आणि विनेश (फोगट) एक आहोत आणि एकच राहू.

बुधवारी पाच तास चाललेल्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी आंदोलक पैलवानांसमोर लेखी प्रस्ताव मांडला. या ठरावात १५ जूनपर्यंत कुस्ती महासंघाच्या प्रमुखांमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन कुस्तीपटूंना देण्यात आले होते, परंतु त्यांच्या अटकेचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यावर मलिक म्हणाली की, १५ जूननंतर पुन्हा आंदोलन कुठे सुरू करायचे ते आम्ही ठरवू. राजधानीत दोन महिन्यांहून अधिक काळ कुस्तीगीरांचा निषेध सुरू आहे. कुस्ती महासंघाचे प्रमुख आणि लैंगिक छळाचे आरोप असलेले भाजप खासदार बृजभूषण शरण सिंह यांना हटवण्याची आणि अटक करण्याची मागणी आम्ही करत आहोत. एका महिला कुस्तीपटूवरील लैंगिक छळाच्या आरोपांच्या चौकशीचा एक भाग म्हणून दिल्ली पोलिसांनी शुक्रवारी कुस्ती संघटनेचे प्रमुख आणि भाजप खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्या कार्यालयाला भेट दिली. सिंग यांच्या अधिकृत निवासस्थानी रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे (WFI) कार्यालय आहे. महिला पोलीसही कुस्तीपटूसोबत होत्या. दुपारी १.३० वाजता ते WFI कार्यालयात पोहोचले आणि तेथे अर्धा तास घालवला. यादरम्यान, कुस्तीपटूला कथित छेडछाडीचा सीन पुन्हा तयार करण्यास सांगितले गेले आणि ज्या ठिकाणी त्याला छळले गेले ते आठवण्यास सांगितले.

### ब्रिजभूषण यांची अटक आवश्यक

ब्रिजभूषण यांची शक्ती आहे. ते आपली मसल पॉवर, राजकीय ताकद आणि खोटे कहाण्या सांगून महिला कुस्तीगीरांना त्रास देण्यात गुंतले आहेत. त्यामुळे त्यांची अटक आवश्यक आहे. पोलिसांनी आम्हाला त्रास देण्याऐवजी त्यांना अटक केली तर न्याय मिळण्याची आशा आहे, अन्यथा नाही. महिला कुस्तीपटू पोलीस तपासासाठी गुन्ह्याच्या ठिकाणी गेल्या होत्या, मात्र त्या तडजोडीसाठी गेल्याची चर्चा प्रसारमाध्यमांमध्ये रंगली होती. विशेष तपास पथकाने (एसआयटी) १८० हून अधिक लोकांची आरोपांबाबत चौकशीचा भाग म्हणून चौकशी केली आहे, असे पोलिसांनी सांगितले.

# श्वीऑनटेकचे तिसरे फ्रेंच विजेतेपद!

## कॅरोलिना मुचोव्हावर संघर्षपूर्ण लढतीत विजय

। पॅरिस ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वर्ल्ड पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑनटेकने चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हाचे कडवे आव्हान तीन सेटच्या झुंजीत ६-२, ५-७, ६-४ असे परतवून लावत फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत गेल्या चार वर्षांत तिसरे विजेतेपद पटकावले. विजेतेपद राखणारी श्वीऑनटेक ही दुसरीच महिला टेनिसपटू ठरली. यापूर्वी २००७ मध्ये जस्टिन हेनिनने अशी कामगिरी केली होती. स्पर्धेत एकही सेट न गमावता अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या श्वीऑनटेकला अंतिम लढतीत मात्र एक सेट गमवावा लागला. श्वीआनटेकचे कारकीर्दीमधील हे चौथे ग्रँडस्लॅम विजेतेपद ठरले.



दुसऱ्या मानांकित आरिना सबालेन्काचा पराभव करून प्रथमच अंतिम फेरीत प्रवेश केलेल्या मुचोव्हाकडून श्वीऑनटेकला प्रतिकार होणार हे अपेक्षित होते. मात्र, श्वीऑनटेकने दोन वेळा सर्व्हिस भेदताना पहिला सेट सहज जिंकून दमदार सुरुवात केली. विशेष म्हणजे दुसऱ्या सेटलाही दुसऱ्याच गेमला ब्रेकची संधी साधून श्वीऑनटेकने ३-० अशी आघाडी घेतली. मात्र, जिगरबाज मुचोव्हाने नंतर सलग तीन गेम जिंकताना प्रथम बरोबरी साधली. पुढे दोन वेळा श्वीऑनटेकची सर्व्हिस भेदत मुचोव्हाने दुसरा सेट जिंकला. दुसऱ्या सेटला मुचोव्हाने दाखवलेली आक्रमकता जबरदस्त होती. मुचोव्हाचे ओव्हरहेडचे फटके श्वीऑनटेकचा कस पहात होते. नेटवर येण्याचे मुचोव्हाचे धाडसही यशस्वी ठरले. तिसऱ्या सेटलाही मुचोव्हाने पहिल्याच सेटला ब्रेकची संधी साधून श्वीऑनटेकसमोर आणखी आव्हान उभे केले. मात्र, अनुभवी श्वीऑनटेकने संयम राखले आणि चौथ्या व दहाव्या गेमला ब्रेकची संधी साधून तिसऱ्या सेटसह विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

# नेमबाजी आणखी एका सुवर्णवेधासह दोन पदक; मनीष आणि सिंहराज यांना पदक

। टोकियो ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



जपानची राजधानी टोकियो येथे सुरू असलेल्या पॅरालिम्पिक २०२० स्पर्धेत भारतीय खेळाडूंची शानदार कामगिरी सुरूच आहे. शनिवारी बॅडमिंटनमध्ये पदक निश्चित झाल्यानंतर काहीच वेळात नेमबाजांनी दोन पदक जिंकून देशाची मान आणखी उंचावली. मनीष नरवाल आणि सिंहराज यांनी मिश्र ५० मीटर पिस्तूल SH1 प्रकारात भारताला पदक मिळून दिले.

मनीषने सुवर्ण वेध घेतला तर सिंहराजने रौप्यपदक जिंकले. या दोघांच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताच्या पदकांची संख्या १५ वर पोहोचली आहे. १९ वर्षीय मनीषने पॅरालिम्पिकमध्ये विक्रम केला. त्याने २१८.२ गुण मिळवले. तर अडानाने २१६.७ गुणांसह रौप्य आणि रशियाच्या सर्जेइ मालिशेवने १९६.८ गुणांसह कांस्य पदक जिंकले. पात्रता फेरीत अडाना चौथ्या तर नरवाल ५३३ गुणांसह सातव्या स्थानवर होता. भारताचा आकाश २७व्या स्थानावर राहिला त्यामुळे त्याला अंतिम फेरीत स्थान मिळवता आले नाही.

टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत ३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कांस्य पदक जिंकून आजवरची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. याआधी भारताची सर्वोत्तम कामगिरी २०१६च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये झाली होती. तेव्हा भारताने २ सुवर्णपदकासह चार पदक जिंकली होती.